<u>**नवी मुंबई महानगरपालिका**</u>

**महानगरपालिका सचिव कार्यालय, नवीन मुख्यालय, 3रा मजला, बेलापूर, नवी मुंबई 400614.**

**-: <u>सर्वसाधारण सभेची नोटीस</u> :-**

**दिनांक : 01/09/2018.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **<u>सप्टेंबर महिन्याची सर्वसाधारण सभा, सोमवार, दिनांक 10 सप्टेंबर 2018 रोजी सकाळी 11.00 वाजता</u>** बेलापूर, भुखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील **<u>राजमाता जिजाऊ सभागृह</u>** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

**1.** इतिवृत्त.

**2.** प्रश्नोत्तरे.

<u>**आयुक्तांकडील प्रस्ताव :**</u>

**3.** बेलापूर विभागातील नेरूळ से.19 भूखंड क्र.87 येथील यशवंतराव चव्हाण क्रिडागणाची सुधारणा करणे या कामास सुधारीत प्रशासकीय मंजूरी मिळणे.

**4.** नेरूळ विभागातील जुईनगर से-24 व 25 मधील रस्ते, गटर व पदपथांची सुधारणा करणे.

**5.** केरळ पुरग्रस्तांसाठी नवी मुंबई महानगरपालिकेकडून मदत निधी देणे.

**6.** विष्णूदास भावे नाट्यगृहातील वाहनतळ भाडे तत्वावर चालविणेकरिता देणे.

<u>**ठरावाच्या सूचना :**</u>

**7 ते 9. श्रीम. संध्या रामजीत यादव, यांजकडून :-**

**(7)** प्रभाग क्र. 06, यादवनगर येथे शाळा क्र. 77 चे इमारत बांधणे. **(8)** प्रभाग क्र. 06, यादवनगर, जयभवानी नगर, संतकबीर नगर, देवीधाम नगर, कृष्णा चाळ येथे मोठी पाणीची पाईप लाईन टाकूण नागरिकांना पाण्याची सोय करणे. **(9)** प्रभाग क्र. 06, यादवनगर, गवतेवाडीच्या समोर आणि देवीधामनगर येथे घर सर्वेक्षण क्र. 1053 च्या जवळ शौचालय बांधणे.

**10 ते 12. श्री. सुरज बाळाराम पाटील, यांजकडून :-**

**(10)** नमुंमपाच्या सर्वसाधारण महासभेमध्ये प्रभाग क्र. 85 व 86 मधील नागरीकांकरीता दोन्ही सन्मा.लोकप्रतिनिधींची मांडलेल्या ठरावाच्या सुचनेनुसार व बजेट मध्ये अंतर्भुत असलेल्या कामानुसार प्रभागामध्ये विकास कामे करणे. **(11)** आधुनिकिकरणाकडे जगाची होत असलेली वाटचाल पाहता नवी मुंबई शहरातही नागरिकांना माहिती, सूचना शहरातील उल्लेखनीय बाबी, इतरत्र बाबीं शहरातील मुख्य चौकांमध्ये एल.ई.डी. स्क्रीन उभारणे. **(12)** नमुंमपा क्षेत्रात मुख्य चौकामध्ये जशी सी.सी.टी.व्ही यंत्रणा बसविण्यात आली आहे. तशीच लहान चौक रहदारीचे रस्ते, बाजार, शाळा, सार्वजनिक वास्तु, उद्याने इतरत्र ठिकाणी सी.सी.सी.टी.व्ही. बसविणे.

**13 ते 15. ॲड. श्रीम. भारती रविकांत पाटील, यांजकडून :-**

**(13)** "प्रभाग क्र. 44, कोपरखैरणे येथील कै.शिवाजीराव पाटील मैदान, से.15 मधील मैदानाचे सुशोभिकरण करणे. **(14)** "प्रभाग क्र. 44, कोपरखैरणे, से.15, 16 व 7 येथील सर्व रस्त्यावरील दिवे संपूर्ण एल.ई.डी. करणे. **(15)** "प्रभाग क्र. 44, कोपरखैरणे, से.15, 16 व 7 येथील सर्व अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे.

**16 ते 18. श्रीम. संगीता दिलीप बोऱ्हाडे, यांजकडून :-**

**(16)** "प्रभाग क्र. 76, सानपाडा, सेक्टर 4 वृंदावन सोसायटी ते ओमसृष्टी आणि समता सोसायटी मधील रस्त्याचे डांबरीकरण करणे. **(17)** "प्रभाग क्र. 76, सानपाडा मधील नटराज सोसायटी ते समता सोसायटी मार्केट मागील रस्त्याची पदपथ व रस्त्याची सुधारणा करणे. **(18)** "प्रभाग क्र. 76, सानपाडा मधील यशोवर्धन सोसायटी ते स्वस्तिक नर्मदा सोसायटी पर्यतची पदपथ नव्याने बनविणे.

**19 ते 21. श्री. जगदिश नाना गवते, यांजकडून :-**

**(19)** "प्रभाग क्र. 5, इलठणपाडा येथील ओव्हरहेड वायर भुमिगत करणे. **(20)** "प्रभाग क्र. 5, इलठणपाडा अंतर्गत रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे. **(21)** "ठाणे-बेलापूर रोड मुकूंद ब्रीजखाली नागरिकांना चालण्यासाठी फुटपाथ आणि मुकूंद कंपनी येथे रोड क्रॉसींगसाठी स्काय वॉक बांधणे.

**22 ते 24. श्रीम. शुभांगी जगदिश गवते, यांजकडून :-**

**(22)** "प्रभाग क्र. 02, ईश्वरनगर व रामनगर येथील ओव्हरहेड वायर भूमिगत करण्यात यावे आणि मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे. **(23)** "प्रभाग क्र. 02, रामनगर येथे ओपन जिम बांधण्यात यावे आणि नवीन स्ट्रीट लाईट पोल टाकणे. **(24)** "प्रभाग क्र. 02, मुकूंद ते आगिवले हाईटस रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे.

**25 ते 27. श्री. सुनील बाळाराम पाटील, यांजकडून :-**

**(25)** "प्रभाग क्र. 92, दारावे येथील गुरूवर्य बाळाराम पाटील विद्यालय व ज्यु. कालेज ते नागेश्वर तलाव नेरूळ से.23 येथील रस्ता अत्यंत खराब झाल्याने नागरिकांची व विद्यार्थ्यांची फार गैरसोय होत आहे. तसेच सदर रस्ता अरूंद असल्याने दुचाकी वाहन रिक्षा, बसेस त्या मार्गावर धावत असल्याने वाहनांची फार गैरसोय होत आहे. तरी सदर रस्त्याची सुधारणा करून डांबरीकरण करणे. **(26)** "प्रभाग क्र. 92, दारावे येथे भाजी मार्केट नसल्याने दारावेगांव, नेरूळ से.23, 21, 25, 27 येथील नागरिकांना भाजी मार्केटसाठी नेरूळ से. 3 येथील जावे लागते. त्यामुळे नागरिकांची मार्केटमुळे गैरसोय होत आहे. म्हणून नेरूळ से. 23 दारावे येथील भुखंड क्र. 14, 15, 16 (सार्वजनिक शौचालयाच्या बाजूस) हा मार्केटसाठी राखीव असून सदर भूखंडावर नागरिकांच्या सोयीसाठी सुसज्ज असे मार्केट बांधणे. **(27)** प्रभाग क्र. 92, नेरूळ से.21 येथील अंतरगत रस्ते व पदपथ नादुरूस्त झालेले आहेत. त्यामुळे तेथील नागरिकांची फार गैरसोय होत आहे. म्हणून सदर परिसरातील रस्ते व पदपथांची सुधारणा व डांबरीकरण करणे.

**28 ते 30. श्रीम. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :- (28)** "प्रभाग क्र. 48, पावणेगांव प्राथमिक शाळेसाठी वर्गखोल्या अपुरे पडत असल्यामुळे अतिरिक्त 4 वर्गखोल्या बांधाव्या त्याचप्रमाणे विद्यार्थीसाठी भोजनगृह बांधणे. **(29)** "प्रभाग क्र. 48, पावणेगांव येथील अंगणवाडीसाठी इमारत व्यवस्था करणे. **(30)** "प्रभाग क्र. 48, मधील श्रमिकनगर येथे प्राथमिक शाळेसाठी वाढीव वर्गखोल्या व भोजनगृह बांधणे.

**31. श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-**
"प्रभाग क्र. 29, घणसोली 2 या प्रभागांत सफाई कामगार संख्या कमी असल्यामुळे साफसफाई योग्य प्रकारे होत नाही. या ठिकाणी सन 2000 साला पासून 22 सफाई कामगार काम करीत होते, सन 2016 साली 4 कामगार वाढवून हि संख्या 26 झाली आहे. प्रभाग क्र. 27 येथील "अर्जुनवाडी" ते प्रभाग क्र. 29 घणसोली 2 मधील टेटर आळी पर्यंत या कामगारांना गटारे साफ करणे, रस्ता पदपथ साफ करणे प्रत्येक भागात जावून ओला कचरा व सुका कचरा गोळा करणे हि कामे करावी लागतात, घणसोली गांवातील लोकसंख्या घरांची संख्या रस्ते व गटार पदपथ यांची हि संख्या वाढली आहे, म्हणून या ठिकाणी सफाई कामगार वाढविणे गरजेचे आहे तसेच नव्या मुंबईतील गाव गावठाण, झोपडपट्टी भागातील सर्व प्रभागांत हिच समस्या आहे. नियमित स्वच्छता होण्यासाठी या सर्व प्रभागात सफाई कामगार वाढविणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरून,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक 01 सप्टेंबर 2018.**